जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २८६ दिनांक - १३/०७/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर

## लोणीकंद पोलीसांनी गावठी हातभटटी केली उध्वस्त

लोणीकंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण भागामध्ये गावठी हातभट्टी दारुचे अवैध धंदे चालु असल्याच्या तक्रारी नागरिकांकडुन पोलीसांना प्राप्त झाल्या होत्या. अशा हातभट्टीच्या दारुमुळे जनसामान्याचे आरोग्य धोक्यात येवुन त्यांचे शरीरावर विपरीत परिणाम होत असल्याने सदर प्रकरणी मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे,श्री.मनोज पाटील,मा.पोलीस उप आयुक्त परि. ४, पुणे श्री. विजयकुमार मगर यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार दि.१२/०७/२०२४ रोजी लोणीकंद पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सावळाराम साळगावकर यांनी पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. निलेश निकाळजे यांचे नेतृत्वाखाली सपोनि गोडसे व त्यांच्या तपास पथकाची एक टिम तयार करून त्यांना योग्य ते निर्देश देऊन मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने रवाना केले होते.त्यानुसार सपोनि गोडसे व त्यांच्या टिमने भावडी गावच्या हद्दीत हांडगर वस्तीजवळ इंद्रायणी नदीच्या पात्रामध्ये इसम नामे **जिवन राजाराम साठे वय २५ वर्षे, रा. लोहगाव पुणे** याने लावलेल्या एका हातभट्टीच्या धंदयावर प्रभावी छापा टाकला.त्यामध्ये त्याने २१० लिटर दारु जप्त करुन, ३०,००० लिटर रसायन, त्याशिवाय दारु गाळण्याचे लोखंडी बॅरल,ॲल्युमिनिअमचा पाईप इ साहित्य, एकुण १,७६,०००/- रु किं.चा मुद्देमाल जागीच ताब्यात घेवुन नष्ट केला. त्या अनुषंगाने लोणीकंद पोलीस स्टेशनला गु.र.क्र. ६७४/२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (फ) (ब) (क), ८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास सपोनि रविंद्र गोडसे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री.मनोज पाटील मा.पोलीस उप आयुक्त परि-४ पुणे श्री. विजयकुमार मगर, मा.सहा. पोलीस आयुक्त येरवडा विभाग,पुणे श्री. विठठल दबडे, लोणीकंद पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस

निरीक्षक, श्री. सावळाराम साळगावकर,  तपास पथकाचे सपोनि रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार तिकोणे, जगताप, माने, चिनके,यांनी केली.